क्रमांक : ८७७५ / ई-१ कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक : जून, २०२०
18 JUN 2020

: : **परिपत्रक** : :

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२० च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित स्वीकृत प्रश्न फेरविचारांती अतारांकित केल्याबाबत**

**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ८२५१/ ई-१ कक्ष, दिनांक २७ मे, २०२०**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, संसदीय कार्य विभागाच्या पूर्वीच्या दिनदर्शिकेनुसार सोमवार, दिनांक २२ जून, २०२० ते शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२० या कालावधीकरिता मा.मंत्र्यांना तारांकित प्रश्नाची उत्तरे देण्याकरिता नेमून देण्यात आलेले दिवस तसेच त्या दिनांकांस निश्चित केलेल्या तारांकित प्रश्नांच्या उत्तराच्या प्रती या सचिवालयास मिळण्याचा अंतिम दिनांक याबाबतची माहिती उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात आले होते. तथापि, बुधवार, दिनांक १० जून, २०२० रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे आगामी पावसाळी अधिवेशन हे आता दिनांक २२ जून, २०२० ऐवजी दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजी पासून सुरु होणार आहे. सबब, सोमवार, दिनांक २२ जून २०२० ते शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२० या कालावधीकरिता यापूर्वीच विभागाकडे पाठवण्यात आलेले सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे विधानपरिषद नियम ७०(२) अन्वये प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत या सचिवालयास न चुकता पाठविण्यात यावीत. मात्र या कालावधीकरिता संबंधित विभागाकडे वस्तुस्थिती करता पाठविलेले प्रश्न फेरविचारांती व्यपगत करण्यात आले आहेत.

(राजेश तारवी)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिन (तीन प्रती)
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई प्रत्येकी(तीन प्रती)

यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित